जा.क्र.:- पशा-१(ब)/गट-१३/वर्ग-४ भरती/जाहिरात/१४६३/२०२२ गडचिरोली दिनांक ११/०३/२०२२

## समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३, विसोरा, ता. वडसा (देसाईगंज) जि. गडचिरोली

# जाहिरात

## भोजन सेवक/सफाईगार या पदाची सरळसेवा भरती - २०२१-२२

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३, विसोरा ता. वडसा (देसाईगंज), जि. गडचिरोली यांचे आस्थापनेवरील वर्ग-४ (गट-ड) भोजन सेवक/सफाईगार या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरीता सरळसेवा भरती आयोजित करण्यात येत असुन भरती करीता पात्र उमेदवारांकडून खालील अटींच्या अधिन राहुन ऑफलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

### ✼ भरावयाच्या पदाचा तपशील ✼

**१) भोजन सेवक :- १२ पदे**

| | खुला | अजा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्युएस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ० | १ | ४ | १ | १ | १ | १ | ० | १ | २ | १२ |
| कंपीकृत आरक्षण | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ० | १ | २ | १ | १ | १ | १ | ० | १ | १ | ९ |
| महिला | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| अंशकालीन/पदवीधर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | ० | १ | ४ | १ | १ | १ | १ | ० | १ | २ | १२ |

**२) सफाईगार :- ३ पदे**

| | खुला | अजा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्युएस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| कंपीकृत आरक्षण | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकुण | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ |

टिप :-
वर नमूद पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे त्यामुळे बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिकाऱ्यास म्हणजेच घटक प्रमुखास राहतील. त्याबाबत उमेदवारांना कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

**२) वेतन श्रेणी व शैक्षणीक अर्हता :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतन श्रेणी | शैक्षणीक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | भोजन सेवक / सफाईगार | १५०००-४७६००/- (एस-१) | ज्याला शासनाने किंवा ईतर प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या शाळेतुन इयत्ता ७ वी मधुन बढ़ती दिलेली आहे. |

**३) आवेदन अर्ज सादर करावयाचे वेळापत्रक :-**

१) जाहीरातीमध्ये नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणारे भोजन सेवक या पदाकरीता ऑफलाईन आवेदन अर्ज खालील नमूद विहीत दिनांकच्या मुदती प्रमाणे ऑफलाईन पद्धतीने सादर करु शकतात.

| | | |
|---|---|---|
| १. | आवेदन अर्ज सादर करण्याचा दिनांक | दि. १५/०३/२०२२ वेळ १०.०० ते १७.०० वा. पर्यंत |
| २. | आवेदन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. ०४/०४/२०२२ वेळ १०.०० ते १७.०० वा. पर्यंत |
| ३. | उमेदवारांना वर्ग-४ भरतीच्या संपुर्ण भरती प्रक्रीयेबाबतची माहिती रुपरेखा (Schedule) संकेतस्थळ | https://www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थळावर गट १३ Tab वर |

**४) अर्जासोबत आकारण्याच्या शुल्काबाबत :-**

| खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|
| रु. ३००/- | रु. १५०/- |

**५) आवेदन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक :-**

भोजन सेवक/सफाईगार या पदाकरीता ऑनलाईन आवेदन अर्ज प्रक्रीया राबविण्यात येणार नसल्याने उमेदवार यांचे करीता ऑफलाईन आवेदन अर्ज दिनांक १५/०३/२०२२ ते दिनांक ०४/०४/२०२२ पर्यंत दररोज सकाळी १०.०० ते सायंकाळी १७.०० वाजता पर्यंत पोलीस कल्याण कार्यालय, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३ विसोरा ता. वडसा (देसाईगंज) जि. गडचिरोली येथे उपलब्ध राहतील. तसेच https://www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थळावर गट १३ या Tab वर उपलब्ध राहतील. आवेदन अर्जाकरिता कोणतीही फी आकारण्यात येणार नाही. उमेदवारांनी आवेदन अर्ज बिनचुक परिपुर्ण भरुन समादेशक, राज्य राखीव पालीस बल गट क्र. १३ विसोरा ता. वडसा (देसाईगंज) जि. गडचिरोली या कार्यालयातील आवक / जावक शाखेत दिनांक ०४/०४/२०२२ चे १७.०० वाजेपर्यंत पोहचतील अशा बेताने आणुन दयावेत. वर नमुद केल्याप्रमाणे प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क चा डिमांड ड्राफ्ट (राष्ट्रीय कृत बँकेचा असावा.) अथवा पोस्टल ऑर्डर समादेशक सहाय्यक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३, (ADJUTANT SRPF GR. XIII) यांचे नावाने काढुन आवेदन अर्जासोबत जमा करावा. आवेदन अर्ज बिनचुक परिपुर्ण भरुन विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास आवेदन अर्जाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच मुळ आवेदन अर्जासोबत संपुर्ण मुळ कागदपत्राच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती व ०३ पासपोर्ट साईज फोटो जोडणे अनीवार्य राहील. (मुळ कागदपत्रांची सुची मुद्दा क्र. ९ मध्ये दर्शविण्यात आली आहे.)

टिप : आवेदन अर्जासोबत परीक्षा शुल्काकरीता चेक किंवा रोख रक्कम स्विकारल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी. डिमांड ड्राफ्ट (राष्ट्रीय कृत बँकेचा असावा.) अथवा पोस्टल ऑर्डर स्विकारल्या जाईल.

**६) वयोमर्यादा (Cut of Date) :** दिनांक ०४/०४/२०२२ रोजी किमान व कमाल वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | भोजन सेवक | दिनांक ०४/०४/२०२२ रोजी कमीत कमी १८ व जास्तीत जास्त ३८ वर्षे पर्यंत असावे. मागासवर्गीयांकरीता ४३ वर्ष. (तसेच सामाजिक आणि समांतर आरक्षणनिहाय उमेदवरांना शासनाने वेळोवेळी घोषित केल्याप्रमाणे शिथिलक्षम राहील.) (शा.नि.क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्यालय/१२, दिनांक २५ एप्रील २०१६) |
| २ | सफाईगार | दिनांक ०४/०४/२०२२ रोजी कमीत कमी १८ व जास्तीत जास्त ३८ वर्षे पर्यंत असावे. |

**७) अटी व शर्ती :-**

१. उमेदवारास फक्त एका पदासाठी व एकाच गटात आवेदन अर्ज सादर करता येईल.

२. सामान्य प्रशासन विभाग अधिसुचना एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक १ जूलै, २००५ अन्वये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ, ब, आणि ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे अनिवार्य आहे.

३. आवेदन अर्जात आपली उच्चतम शैक्षणिक पात्रता नमुद करावी त्याबाबतचे प्रमाणपत्र आवेदन अर्जासोबत जोडण्यात यावे.

४. वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ नुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारास नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू राहील. तथापी, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९५४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही. तसेच शासन वित्त विभाग निर्णय क्र. अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४ दिनांक २७ ऑगस्ट २०१४ नुसार नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना यापुढे ''राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS)'' या नावाने लागु होईल.

५. नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुद्धीपत्रकांमधील तसेच, मुंबई राज्य राखीव पोलीस बल अधिनियम, १९५१ व मुंबई राज्य राखीव पोलीस बल नियम, १९५९, मुंबई पोलीस नियमावली-१९९९ मधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील तसेच वर्ग-४ संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रक/आदेश लागू राहतील.

६. कामाचे क्षेत्र मर्यादा/ठिकाण :- निवड होणाऱ्या पुरुष/महीला उमेदवारांना वारंवार कोणत्याही वेळी गट मुख्यालया व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्यात कोठेही (उदा.: गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर या नक्षलग्रस्त भागासह) तसेच महाराष्ट्र राज्याबाहेर आंतर सुरक्षा बंदोबस्तासाठी कंपनीसोबत जावे लागेल.

**८) व्यावसायिक चाचणी बाबत :**

| अ.क्र. | पदनाम | चाचणी |
|---|---|---|
| १ | भोजन सेवक | १०० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. |
| २ | सफाईगार | १०० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. |

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिम १२१६/(प्र.क्र. ६५/१६)/१३-अ, दिनांक १३ जून २०१८ नुसार १०० गुणांची व्यवसायिक चाचणी घेण्यात येईल. भोजन सेवक यांची व्यावसायीक चांचणीच्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार व प्रवर्गानुसार निवड यादी व प्रतिक्षा यादी सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १६.०३.१९९९, १३.०८.२०१४ व दिनांक १९.१२.२०१८ चे शुद्धीपत्रकामध्ये दिलेल्या निर्देशानुसार तयार करण्यात येईल.

वरील पदांच्या भरतीकरीता मोठया संख्येने अर्ज प्राप्त झाल्यास सर्व उमेदवरांची व्यावसायीक चाचणी शक्य/व्यवहार्य नसल्यास उमेदवरांची संख्या मर्यादित होण्यासाठी व अधिक सक्षम उमेदवार उपलब्ध होण्याकरीता संबंधित निवड समीती सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिम १२१६/(प्र.क्र.६५/१६) १३-अ दिनांक १३ जुन २०१८ मधील नियम ८(१) (२) नुसार आधी चाळणी लेखी परिक्षेचा पर्याय निवडु शकेल.

**९) आवश्यक कागदपत्रे :-**

१. पदाकरीता धारण करत असलेले विहित अर्हताची व त्यावरील शैक्षणिक गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला.
२. जातीचे प्रमाणपत्र.
३. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमीसाईल (Domicile) प्रमाणपत्र धारण करणे बंधनकारक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
४. जातीचे वैधता प्रमाणपत्र
५. अनुसुचीत जाती/जमाती, ईडब्ल्युएस व खुला या प्रवर्गातील उमेदवार वगळुन मार्च-२०२१ चे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.
६. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
७. शासकीय/निमशासकीय अथवा अन्य प्रकारच्या नोकरीत असलेल्या उमेदवारांनी नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
८. सर्व आवश्यक वर नमुद कागदपत्रे ही दि. ०४/०४/२०२२ पर्यंत निर्गमित केलेले असावेत.
९. उमेदवारांना कागदपत्र पडताळणी/व्यवसायिक चाचणीसाठी नियोजित स्थळी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. त्याकरिता कोणत्याही प्रकारचा दैनिक प्रवास भत्ता देय राहणार नाही.
१०. कागदपत्र पडताळणी व व्यावसायिक चाचणीच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे सोबत आणने आवश्यक आहे. मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे सोबत न आणल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**१०) समांतर आरक्षण :-**

| अ.क्र. | आरक्षण | तपशिल |
|---|---|---|
| १ | महिला आरक्षण | प्रवर्गानुसार रिक्त पदाचे ३० टक्के आरक्षण हे महिला उमेदवरांसाठी लागू राहील. ज्या पदासाठी महिला उमेदवार उपलब्ध होणार नाहीत त्या पदावर पुरुष उमेदवारांची निवड करण्यात येईल. खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे प्रभावी असलेले नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र बंधनकारक राहिल. |
| २ | माजी सैनिक | प्रवर्गानुसार १५ टक्के इतके समांतर आरक्षण सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील दिनांक १६/०४/१९८१ चे परिपत्रक आणि त्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशान्वये निर्धारीत केलेल्या अटी व शर्ती नुसार असेल. |
| ३ | खेळाडू | शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या शासन निर्णयानुसार उपलब्ध पदाच्या ५ टक्के पदे खेळाडुसाठी राखीव असतील. सदर आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. राक्रिधो. २००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०/०४/२००५ आणि त्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशान्वये निर्धारीत केलेल्या अटी व शर्तीनुसार असेल. |
| ४ | प्रकल्पग्रस्त भुकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्तांना ५ टक्के व भुकंपग्रस्तांना २ टक्के आरक्षण शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. भुकंप-१००९/प्र.क्र./२०७/२००९/१६-अ, दिनांक २७/०८/२००९ आणि त्यानंतर शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशान्वये निर्धारीत केलेल्या अटी व शर्तीनुसार असेल. |
| ५ | पदविधर पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. अशंका १९१८/प्र.क्र. ५०७/१६-अ, दिनांक ०२/०१/२०१९ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार वयोमर्यादेत शिथिलता ५५ वर्षे इतकी राहिल. |
| ६ | अनाथ | महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील दिनांक ०२/०४/२०१८ चे शासन निर्णयान्वये आनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातुन १ टक्का समांतर आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर प्रवर्गातुन जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदसंख्ये इतके उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुषेश पुढे न ओढता खुल्या प्रवर्गात इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल. आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिनाऱ्या उमेदवारांनी अर्ज सादर करतांना तशी नोंद करणे व कागदपत्र पडताळणीच्या वेळी अनाथ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. |
| ७ | स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य,सन १९९१ चे जनगणना पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी यांचेसाठी | सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.निवक-१०१०/प्र.क्र. ०८/२०१०/१६-अ, दिनांक ०६/१०/२०१० मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहिल तसेच या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी देखील उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहिल. |

**११) दिव्यांग व्यक्तीचे आरक्षण :-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ चे आधारे शा. निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९/०५/२०१९ तसेच या संदर्भात शासनाकडुन वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या शासन आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१२) महत्वाच्या सुचना :-**

१) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असने आवश्यक आहे.
२) निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवार यांना नियुक्ती आदेश निर्गमीत केल्याच्या दिनांकापासुन ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.
३) अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळुन आल्यास संबंधीत उमेदवार अपात्र ठरेल व कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहिल.
४) भरती प्रकियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरीक ईजा/नुकसान झाल्यास शासन जबाबदार राहणार नाही.
५) भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
६) निवड झालेल्या उमेदवाराची वैद्यकिय तपासणी करण्यात येईल वैद्यकिय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणुक रद्द करण्यात येईल.
७) जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहिल.
८) भरती प्रक्रिया/ परीक्षा स्थगित करणे अथवा रद्द करणे, परिक्षेचा प्रकार, (सामाजिक अथवा समांतर आरक्षण) अंशतः/पुर्णतः बदल करणे, संवर्ग निहाय एकुण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रार बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार निवड समिती यांना असतील. त्याबाबत उमेदवारास अथवा इतर कोणासही कोणताही दावा करता येणार नाही.
९) उमेदवारास आवेदन अर्ज आणुन देण्याकरिता व व्यावसायीक चांचणीकरीता स्वखर्चाने यावे लागेल.
१०) उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीस येतांना सोबत नजीकच्या काळात काढलेले पासपोर्ट साईजचे ५ फोटो आणणे आवश्यक आहे.

**१३) निवडसुची कालावधी :** सदर भरतीची निवडसुची कालावधी हा शासनाने विहित केल्यानुसार विधिग्राहय राहिल. त्यानंतर निवडसुची व्यपगत होईल.

**१४) परिक्षेचे केंद्र :-** समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३ विसोरा ता. वडसा (देसाईगंज) जि. गडचिरोली ,

**परीक्षेचा दिनांक व वेळ :** ०८/०४/२०२२ सकाळी ०७.०० वाजता.

टिप :- उमेदवारांनी परीक्षेला येतांना मुळ शैक्षणिक प्रमाणपत्रासह व साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रतीसह हजर राहावे.

कार्यालयाचा पत्ता :- समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३ विसोरा ता. वडसा (देसाईगंज) जि. गडचिरोली
दुरध्वनी क्रमांक - 07137-295053, मो. 9130158581, ई मेल- srpfgr13@rediffmail.com,

स्वाक्षरी/-
(विवेक मासाळ)
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १३ विसोरा
ता. वडसा (देसाईगंज) जि. गडचिरोली